# राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद सातारा अंतर्गत
# फक्त एमपीडबल्यु (पुरुष) पदासाठी अर्ज करणेत आलेल्या उमेदवारांसाठी
# सुचना व शुध्दीपत्रक

फक्त एमपीडबल्यु (पुरुष) या पदासाठी या कार्यालयाकडे दि. १८/०५/२०२२ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार १२ वी उत्तीर्ण सायन्स + १२ वी सायन्स नंतरचा पॅरामेडीकल बेसीक कोर्स (पॅरामेडीकल काउन्सिल मान्यताप्राप्त) किंवा सॅनिटरी इन्स्पेकटर कोर्स ही शैक्षणिक अर्हता होती. त्यानुसार अर्ज केलेल्या उमेदवारांची तात्पुरती पात्र/अपात्र यादी खालीलप्रमाणे प्रसिध्द करणेत आलेली आहे. परंतु राज्य शासनाकडुन नुकत्याच दि. ०५/०७/२०२२ रोजी प्राप्त झालेल्या पत्रातील सुचनेनुसार एमपीडबल्यु (पुरुष) या पदासाठी खालीलप्रमाणे निकष ठरविणेत आलेले आहेत.

१) अठरा वर्षापेक्षा कमी वयाचे नाहीत आणि अडतीस वर्षापेक्षा अधिक वयाचे नाहीत, परंतु राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.

२) विज्ञान शाखेतुन उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा किंवा शासनाने तिच्याशी समतुल्य घोषित केलेली इतर कोणतीही परिक्षा उत्तीर्ण केलेली आहेत; आणि

३) विभागाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र किंवा सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपुर यांच्याकडुन आरोग्य कर्मचारी पदासाठी निश्चित केलेला निमवैद्यकिय मुलभुत प्रशिक्षण अभ्यासक्रम किंवा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरीक्षक (सॅनिटरी इन्स्पेकटर) किंवा महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरीक्षक (सॅनिटरी इन्स्पेकटर) किंवा समकक्ष अभ्यासक्रम पुर्ण करुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

त्यामुळे यापुर्वी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीतील शैक्षणिक अर्हता बदलुन वरीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता राहील.

**१)** यापुर्वी अर्ज न केलेल्या नविन उमेदवारांनी उपरोक्त शैक्षणिक अर्हता असलेस दि. १८/०५/२०२२ रोजीच्या जाहिरातीनुसार एमपीडबल्यु (पुरुष) पदासाठीच्या सुचना व शुध्दीपत्रकानुसारची शैक्षणिक अर्हता असल्यास **प्रक्रिया शुल्क** भरुन दि. ०८/०७/२०२२ ते दि. १४/०७/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत शासकीय सुट्टी वगळुन राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा परिषद, सातारा येथे समक्ष अर्ज सादर करावेत.

**२)** यापुर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी शुध्दीपत्रकानुसार शैक्षणिक अर्हता असलेस दि. ०८/०७/२०२२ ते दि. १४/०७/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत शासकीय सुट्टी वगळुन समक्ष **प्रक्रिया शुल्क न भरता** केवळ अधिकची कागदपत्रे सादर करावीत.

**३)** ई-मेल व्दवारे, दुरध्वनीद्वारे किंवा इतर कोणत्याही पध्दतीने किंवा माध्यमाव्दारे हरकती अथवा कागदपत्रे सादर करणेत येवू नयेत. उमेदवारांने स्वत: उपस्थित राहुन कागदपत्रे सादर करावीत.

| | | |
|---|---|---|
| प्र. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक,<br>जिल्हा परिषद सातारा | जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>जिल्हा परिषद सातारा | मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद सातारा |

Scanned with CamScanner